# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, पालघर

**P.R.O. Office,Palghar**

phone no 02525-297032,Mo No 8669604078
Address-sp office Bidco Road,Palghar west
E-Mail- propalghar@gmail.com


## प्रेसनोट क्र.६३५ दिनांक ०८.०८.२०२०

# तुळींज पोलीस ठाण्याकडुन खुनाच्या गुन्हयाची उकल करुन आरोपीतांना अटक

दिनांक २८/०७/२०२० रोजी रात्रौ ११.३० वा.चे सुमारास तुळींज पोलीस ठाणे हद्दीत मयत अंध ईसम व त्यांची पत्नी यांचे घराबाहेर दोन अनोळखी इसम आरडा ओरडा करुन गोंधळ करीत असल्याने मयत इसमाने दोन्ही आरोपीतांना शांत राहण्यास सांगीतलेचा राग येवुन आरोपीत यांनी मयत इसम व त्यांची पत्नी यांना लाथाबुक्यांनी तसेच ब्लेडने वार करुन मारहाण केली. सदरबाबत फिर्यादी नामे सौ. ललीता मुकेश सुलपतबहार वय ४० वर्षे रा. जेसीका चाळ, जिजाईनगर, मोरेगांव नालासोपारा पुर्व ता.वसई जिल्हा पालघर यांनी तुळींज पोलीस ठाणेत दिलेल्या तक्रारीवरुन गुन्हा रजि क्रमांक I ६८३/२०२० भा.द.वि.स. कलम ३०२, ३२४, ५०६, ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेवुन श्री. दत्तात्रय शिंदे, पोलीस अधीक्षक,सो, पालघर यांचे सुचनेप्रमाणे श्री. विजयकांत सागर, अप्पर पोलीस अधीक्षक, वसई व श्री अमोल मांडवे, उपविभागिय पोलीस अधिकारी, नालासोपारा यांच्या मार्गदर्शनानुसार गुन्हयाचे अन्वेशन करण्यासाठी आरोपीत यांनी कोणताही पुरावा मागे सोडलेला नसतांना श्री. डी.एस. पाटील वरीष्ठ पोलीस निरीक्षक यांनी गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व कर्मचारी यांना सुचना दिल्या होत्या. त्या अनुषंगाने गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पोउपनिरी श्री संदिप व्हसकोटी यांनी कोणताही तांत्रीक पुरावा नसतांना कौशल्यपुर्ण व अतिशय शिघ्रगतीने कष्टप्रदरित्या गोपनीय माहीती मिळवुन गुन्हयातील आरोपीत नामे १) उमेश प्रकाश जोशी वय-२६ वर्षे रा. शिवमंदिरजवळ, मोरेगांव, नालासोपारा पुर्व २) प्रदिप शांताराम पानकर वय २९ वर्षे रा. कारगीनगर, विरार पुर्व यांना ताब्यात घेवुन त्यांचेकडे गुन्हयाबाबत कसुन विचारपुस केली असता त्यांनी गुन्हयाची कबुली दिली असुन आरोपीत यांना दि.०७/०८/२०२० रोजी १९.०४ वा अटक करण्यात आली आहे.

सदरची कारवाई तुळींज पोलीस ठाणेचे श्री.डी.एस.पाटील, वरीष्ठ पोलीस निरीक्षक यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पोलीस उपनिरीक्षक संदीप व्हसकोटी ,सहाय्यक फौजदार शिवानंद सुतनासे, पो.हवा. युवराज जावळे पो.ना आनंद मोरे ,पो.ना संदीप शेरमाळे, पो.ना शेखर पवार, पो.ना प्रशांत सावदेकर,पो कॉ सुखराम गडाख, पो.कॉ योगेश नागरे, यांच्या पथकाने केलेली आहे.